दैनिक

# चममक

संपादक : शामसुंदर चितोडा | कार्यकारी संपादक : कैलास फुलारी

वर्ष : ०९ : | अंक १३ वा | जालना | गुरूवार १३ ऑगस्ट २०२६ | पाने : ४ | किंमत : २ रुपये




# अवैध शस्त्रासाठी राजस्थानात जाऊन हत्यारे खरेदी ; तिघांना अटक

## फरार 'इम्मू डॉन' पोलिसांच्या जाळ्यात ; चितोडगडपर्यंत तपासाची पाळेमुळे, ट्रॅव्हल्सद्वारे फुलंब्रीपर्यंत व नंतर ईटिंगाद्वारे जालन्यात हत्यारे पोहोचल्याचा पोलिसांचा दावा



जालना । प्रतिनिधी : अवैध शस्त्रविक्रीच्या उद्देशाने साठवून ठेवण्यात आलेल्या ४१ घातक शस्त्रांच्या प्रकरणाचा तपास करताना चंदनझिरा पोलिसांनी महत्त्वपूर्ण कारवाई केली आहे. पोलिसांनी राजस्थानातील चितोडगडपर्यंत तपासाची पाळेमुळे शोधून काढत फरार आरोपीला अटक केली आहे. या प्रकरणातील तिन्ही आरोपींना न्यायालयाने दि. १७ ऑगस्ट २०२६ पर्यंत पाच दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

चंदनझिरा पोलीस ठाणे हद्दीत अवैध शस्त्रविक्री करण्याच्या उद्देशाने साठवून ठेवलेल्या ४१ घातक हत्यारांच्या प्रकरणात पोलिसांनी तपासाची चक्रे गतिमान केली. यापूर्वी मोठ्या प्रमाणात अवैध हत्यारे जप्त करून कारवाई करण्यात आली होती. त्यानंतर गुन्ह्यातील फरार आरोपी शेख इस्माईल शेख सलीम उर्फ 'इम्मू डॉन' याचा शोध घेण्यात आला. पोलिसांच्या तपासात तो राजस्थानातील चितोडगड येथे असल्याची माहिती मिळाल्यानंतर पथकाने तेथे जाऊन त्याला ताब्यात घेतले. या प्रकरणातील आरोपींच्या अटकेनंतर हत्यारांच्या खरेदी-विक्रीसह त्यांच्या पुरवठा साखळीचा तपास अधिक व्यापक झाला आहे. राजस्थानातील चितोडगड येथील व्यक्तीकडून हत्यारे खरेदी करण्यात आल्याची माहिती पोलिसांना मिळाली असून, संबंधित व्यक्तीची ओळख व भूमिकेबाबत तपास सुरू आहे. ट्रॅव्हल्समार्फत हत्यारांची वाहतूक तपासादरम्यान जप्त करण्यात आलेला शस्त्रसाठा ट्रॅव्हल्स बसच्या माध्यमातून राजस्थानातून महाराष्ट्रातील फुलंब्री येथे पाठविण्यात आल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर 'इम्मू डॉन' व माजेद शेख यांनी ईटिंगाच्या गाडीमधून हा शस्त्रसाठा जालना येथे आणल्याचे तपासात समोर आल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलिसांनी संबंधित ट्रॅव्हल्सची माहिती, बसचा मार्ग, पार्सल पाठविणारे व स्वीकारणारे व्यक्ती तसेच त्यांच्यातील संपर्क याबाबत माहिती संकलित केली आहे. राजस्थानातून पार्सल ट्रॅव्हल्सच्या माध्यमातून महाराष्ट्रात पाठविण्यात आले असून, या वाहतुकीशी संबंधित व्यक्ती व घटकांची सखोल चौकशी सुरू आहे. तिन्ही आरोपी पाच दिवस पोलिस कोठडीत अटक करण्यात आलेल्या तिन्ही आरोपींना तपास अधिकारी रवि देशमाने यांनी न्यायालयासमोर हजर केले. न्यायालयाने आरोपींना दि. १७ ऑगस्टपर्यंत पाच दिवसांची पोलिस कोठडी (झउठ) सुनावली आहे. गुन्ह्यात वापरण्यात आलेली ईटिंगा कार तसेच शस्त्रविक्रीच्या नेटवर्कसाठी वापरण्यात आलेला मोबाइल फोन असा सुमारे ७ लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. या प्रकरणाचा तपास विविध अंगांनी सुरू असून, शस्त्रांच्या पुरवठा साखळीतील इतर व्यक्तींचाही शोध घेतला जात आहे.

पूर्वीच्या खुनाच्या प्रकरणाशीही धागेदोरे? मागील आठवड्यात कदीम जालना पोलीस ठाणे हद्दीतील नूतन वसाहत भागात अजय आढाव याचा खून झाला होता. या खुनात वापरण्यात आलेले धारदार खंजरसुद्धा याच टोळीने विक्री केले असल्याचे तपासात पुढे आल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. त्यामुळे अवैध शस्त्रविक्रीचे हे नेटवर्क आणखी किती मोठे आहे, याचा तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे.

पोलिस कोठडीदरम्यान आरोपींकडून हत्यारांचा स्रोत, खरेदी-विक्रीचे व्यवहार, त्यामागील व्यक्ती, संपर्कातील साथीदार तसेच हत्यारांच्या संभाव्य वितरणाबाबत सखोल चौकशी केली जात आहे. जालना शहरासह परतूर, जाफराबाद व भोकरदन परिसरातील शस्त्र खरेदी-विक्री करणाऱ्या व्यक्तींचीही पोलिसांकडून माहिती घेतली जात आहे.

'आरोपींची मोडस' उघड पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपी शस्त्रांची ने-आण करताना ट्रॅव्हल्स बसचा वापर करीत होते. ज्या रस्त्यावर सीसीटीव्ही कॅमेरे नाहीत, अशा मार्गांचा वापर केल्याचे तपासात दिसून आले आहे. जप्त करण्यात आलेली ४१ घातक शस्त्रे आणताना आरोपींनी सिलोड व छत्रपती संभाजीनगर (पान ३ वर)

# जिल्हा मध्यवर्ती बँकेला आधुनिकतेची नवी दिशा

### अध्यक्ष राहुल लोणीकर यांनी विविध पतसंस्था तसेच खासगी बँकांच्या संचालकांशी साधला संवाद; ग्राहकांना सक्षम व आधुनिक बँकिंग सुविधा देण्यावर भर

जालना । प्रतिनिधी : जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष राहुल लोणीकर यांनी आज बँकेच्या मुख्य शाखेत विविध पतसंस्था तसेच खासगी बँकांच्या संचालकांशी संवाद साधला. जिल्ह्यातील सहकार क्षेत्र अधिक सक्षम करण्यासोबतच नागरिकांना आधुनिक आणि दर्जेदार बँकिंग सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या ठेवी वाढविणे, ग्राहकांना अधिक सक्षम व आधुनिक बँकिंग सुविधा उपलब्ध करून देणे तसेच सहकार क्षेत्र अधिक बळकट करण्यासाठी विविध संस्थांमध्ये परस्पर समन्वय वाढविणे याबाबत चर्चा झाली. जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, व्यापारी आणि उद्योजकांना अधिक चांगल्या बँकिंग सेवा मिळाव्यात, यासाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करून सेवा अधिक गतिमान करण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला.

सहकार क्षेत्राच्या बळकटीसाठी समन्वयावर भर जिल्ह्यातील विविध सहकारी संस्था, पतसंस्था आणि बँकिंग क्षेत्रातील संस्थांमध्ये परस्पर समन्वय वाढल्यास सहकार क्षेत्राला अधिक गती मिळू शकते. या पार्श्वभूमीवर विविध संस्थांच्या संचालकांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी, सूचना आणि अपेक्षा जाणून घेण्यात आल्या. जालना जिल्ह्यातील नागरिकांना अधिक चांगल्या बँकिंग सेवा मिळाव्यात, यासाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला अधिक सक्षम, विश्वासार्ह आणि आधुनिक बँक म्हणून विकसित करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. शेतकरी, व्यापारी व उद्योजकांना फायदा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून शेतकरी, व्यापारी, उद्योजक तसेच सर्वसामान्य नागरिकांना विविध आर्थिक सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. बँकेच्या सेवा अधिक सुलभ आणि आधुनिक झाल्यास ग्रामीण व शहरी भागातील ग्राहकांना त्याचा थेट फायदा होणार आहे.



बँकेच्या ठेवी वाढविण्यासोबतच ग्राहकांचा विश्वास अधिक दृढ करण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्यावरही बैठकीत भर देण्यात आला. सहकार क्षेत्रातील विविध संस्थांना सोबत घेऊन जिल्ह्याच्या आर्थिक विकासाला चालना देण्याच्या दृष्टीने पुढील काळातही संवाद व समन्वय सुरू ठेवण्याचे संकेत राहुल लोणीकर यांनी दिले.

# जालन्याचा खेळाडू प्रथमच करणार भारताचे प्रतिनिधित्व



जालना/प्रतिनीधी : आगामी ऑक्टोंबर महिन्यात बेंगलुरू येथे होणार असलेल्या आशियाई मास्टर्स चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी जालन्यातील आयर्नमॅन कैलास झोळगे यांची निवड झाली असून त्यांच्या रूपाने जालन्याचा खेळाडू प्रथमच भारताचे प्रतिनिधित्व करणार असून या उल्लेखनीय व ऐतिहासिक यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे. पुण्यातील बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलात स्विमिंग फेडरेशन ऑफ इंडिया व महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन यांच्या वतीने दि.८ व ९ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र राज्य मास्टर्स एक्काटिक चॅम्पियनशिप- २०२६ स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत जालन्यातील आयर्नमॅन तथा प्रसिद्ध जलतरणपटू कैलास झोळगे या खेळाडूने दमदार कामगिरी करत तब्बल ५ पदकं पटकावत यशाचे शिखर गाठत जालना जिल्ह्याचे नाव उज्वल केले आहे. झोळगे यांनी ५०, १०० आणि २०० ब्रेस्टस्ट्रोक या तिन्ही प्रकारात सुवर्ण पदके पटकावली असून ५० फ्रीस्टाईल मध्ये रौप्य आणि ५० बटरफ्लाय मध्ये कांस्य पदकाची कमाई केली आहे. या उत्कृष्ट कामगिरीमुळे ऑक्टोबरमध्ये बेंगलुरु येथे होणाऱ्या आशियाई मास्टर्स चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी त्यांची निवड झाली आहे. विशेष म्हणजे या स्पर्धेत महाराष्ट्रातील मुंबई, ठाणे,पुणे,नागपूर,कोल्हापूर, सातारा,सांगली,नाशिक, छत्रपती संभाजीनगर यांसह अनेक जिल्ह्यातील खेळाडूंनी भाग घेतला होता. कैलाश झोळगे ह्यांच्या या अष्टपैलू कामगिरीमुळे संपूर्ण महाराष्ट्राला अभिमान वाटत आहे. या यशाबद्दल आयपीएस अधिकारी बारकुंड डॉल्फिन स्पोर्ट्स क्लब व मित्रपरिवार यांच्यातर्फे पुढील स्पर्धेसाठी कैलाश झोळगे यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

# अखिल भारतीय आदिम महासंघाच्या महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीसपदी ॲड. सुरेश काळे यांची नियुक्ती

छत्रपती संभाजीनगर : आदिवासी, मूलनिवासी आणि पारधी समाजावर होणाऱ्या अन्याय-अत्याचाराविरोधात तसेच त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी आणि संविधानिक अधिकारांच्या संरक्षणासाठी देशभर कार्यरत असलेल्या आदिम महासंघ (महाराष्ट्र राज्य) च्या महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीसपदी ॲड. सुरेश रामा काळे यांची नियुक्ती करण्यात आली.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सुभेदारी गेस्ट हाऊस येथे आयोजित कार्यक्रमात आदिम महासंघाचे राष्ट्रीय संघटन महासचिव बबन गोरामन आणि राष्ट्रीय सदस्य तथा महाराष्ट्र प्रभारी सुदर्शनजी शिंदे यांच्या हस्ते ड. सुरेश काळे यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. आदिम महासंघ ही संघटना भारतातील १८



राज्यांमध्ये कार्यरत असून आदिवासी, मूलनिवासी, जंगलातील रहिवासी आणि पारधी समाजाच्या न्याय, हक्क व संविधानिक अधिकारांसाठी काम करते. समाजावर होणारे अन्याय-अत्याचार, सामाजिक व प्रशासकीय पातळीवरील भेदभाव, शैक्षणिक व आर्थिक मागासलेपणा तसेच मूलभूत हक्कांपासून वंचित राहणाऱ्या घटकांच्या प्रश्नांना संघटनेच्या माध्यमातून वाचा फोडण्याचे काम केले जाते.

पारधी समाजासह विविध आदिवासी व मूलनिवासी समाजाच्या प्रश्नांसाठी सातत्याने काम करणारे ॲड. सुरेश काळे यांच्यावर महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीसपदाची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली आहे. या माध्यमातून राज्यातील आदिवासी आणि पारधी समाजाच्या न्याय्य मागण्या शासन दरबारी मांडून संविधानिक अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी संघटितपणे लढा उभारण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

यावेळी ड. सुरेश काळे म्हणाले, आदिवासी, मूलनिवासी आणि पारधी समाजावर होणारा अन्याय-अत्याचार सहन केला जाणार नाही. संविधानाने दिलेले अधिकार समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी आणि न्याय मिळवून देण्यासाठी आदिम महासंघाच्या माध्यमातून महाराष्ट्रभर प्रभावीपणे काम केले जाईल.

या कार्यक्रमाला महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतून आदिम महासंघाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. ॲड. सुरेश काळे यांच्या नियुक्तीबद्दल उपस्थित मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# विकासाचे प्रश्न मार्गी लावून सामान्य जनतेला मूलभूत सुविधा देण्याचा प्रयत्न करावा : दानवे



जालना (प्रतिनीधी) शहरातील विकासाचे प्रश्न मार्गी लावतांनाचं सामान्य जनतेला मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी स्थायी समिती सभापती अशोक पांगारकर यांनी नवीन दालनाच्या माध्यमातून प्रयत्न करावा,अशी अपेक्षा माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री तथा भाजपाचे ज्येष्ठ नेते रावसाहेब पाटील दानवे यांनी येथे बोलतांना व्यक्त केली.

जालना मनपाचे स्थायी समिती सभापती अशोक पांगारकर यांच्या महानगर पालिकेतील दालनाचा शुभारंभ माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या हस्ते करण्यात आले.याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार कैलाश गोरंट्याल,महानगर अध्यक्ष भास्कर दानवे, माजी नगराध्यक्षा तथा विद्यमान नगरसेविका संगीताताई गोरंट्याल,महापौर वंदनाताई मगरे, उपमहापौर राजेश राउत, अक्षय गोरंटयाल, सभापती मायाताई जोशी, विजय पांगारकर, अनामिका पांगारकर, सौ. पानबिसरे, शशिकांत घुगे, बद्रीनाथ पठाड़े, जीवन सले, रमेश गौरक्षक, अशोक पवार, महावीर ढक्का, शिवराज जाधव आदींची उपस्थिती होती. यावेळी बोलतांना माजी आमदार कैलास गोरंटयाल म्हणाले की, शहरातील जनतेने प्रथमच झालेल्या जालना मनपाच्या निवडणुकीत स्पष्ट बहुमत देत मनपाची सत्ता भाजपकडे सोपवली. जनतेचा विश्वास (पान ३ वर)

# जालना शहरात विनापरवाना फलक लावणार्यांवर होणार फौजदारी कारवाई; अनाधिकृत होर्डिंग्स २४ तासांत हटवण्याचे आयुक्त अंजली शर्मा यांचे निर्देश

जालना : प्रतिनिधी : जालना शहर महानगरपालिका हद्दीत विनापरवाना लावण्यात आलेले जाहिरात फलक, होर्डिंग्स, बॅनर्स आणि पोस्टर्सवर आता प्रशासनाकडून कठोर कारवाई केली जाणार आहे. मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी जनहित याचिका क्र. १५५/२०११ (सुस्वराज्य फाऊंडेशन विरुद्ध महाराष्ट्र राज्य व इतर) मध्ये ३१ जानेवारी २०१७, ९ एप्रिल २०२४ आणि १८ नोव्हेंबर २०२४ रोजी दिलेल्या आदेशांच्या अनुषंगाने जालना महानगरपालिकेने ही कठोर भूमिका घेतली आहे. महानगरपालिका आयुक्त अंजली शर्मा (भा.प्र.से.) यांनी जाहीर सूचना प्रसिद्ध करून शहरातील सर्व नागरिक, व्यावसायिक, राजकीय पक्ष, जाहिरात संस्था आणि प्रिंटिंग प्रेस यांना स्पष्ट निर्देश दिले आहेत. जालना महानगरपालिकेची रीतसर परवानगी घेतल्याशिवाय आणि निश्चित केलेल्या जागांव्यतिरिक्त शहरात इतरत्र कुठेही जाहिरात



साहित्य लावण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. २४ तासांची अंतिम मुदत विजेचे खांब, रस्त्यांच्या कडेला, सार्वजनिक ठिकाणी तसेच कोणत्याही धोकादायक अथवा जोखमीच्या ठिकाणी अनाधिकृतपणे लावलेले होर्डिंग्स, बॅनर्स, पोस्टर्स, शुभेच्छा फलक, झेंडे व धार्मिक कार्यक्रमांचे फलक संबंधितांनी स्वत:हून २४ तासांच्या आत काढून घ्यावेत, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. दंडात्मक व फौजदारी कारवाईचा इशारा दिलेल्या २४ तासांच्या विहीत मुदतीत हे अनाधिकृत साहित्य न काढल्यास, महानगरपालिकेमार्फत ते जप्त करून संबंधित व्यक्ती किंवा संस्थेकडून दंड वसूल केला जाईल. तसेच 'महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९' आणि 'महाराष्ट्र मालमत्ता विरूपणास प्रतिबंध अधिनियम १९९५' अन्वये संबंधितांविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल केले जातील, असा गंभीर इशारा आयुक्त अंजली शर्मा यांनी दिला आहे.

# पालकमंत्री पंकजा मुंडे यांचा जालना जिल्हा दौऱ्यावर

जालना/प्रतिनिधी : राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा गोपीनाथ मुंडे या जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौऱ्यातील कार्यक्रम पुढीलप्रमाणे असणार आहेत. पालकमंत्री श्रीमती मुंडे यांचे शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट, २०२६ रोजी सकाळी ९.४५ वाजता शासकीय विश्रामगृह छत्रपती संभाजीनगर येथून जालनाकडे प्रयाण करतील. सकाळी १०.४५ वाजता आगमन व एमआयडीसी फेस वन छत्रपती संभाजीनगर चौफुली- जालना येथील भाजपा



जिल्हा कार्यालय नवीन इमारत भूमीपूजन कार्यक्रमास उपस्थिती राहतील. त्यानंतर दुपारी १.00 वाजता जालना येथून छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण करतील. दुपारी २.00 वाजता आगमन व मुख्यमंत्री महोदयांच्या हर घर तिरंगा अभियान रॅलीत सहभागी होतील. सायंकाळी ५.00 वाजता छत्रपती संभाजीनगर येथून जालनाकडे प्रयाण करतील. सायंकाळी ६.00 वाजता शासकीय विश्रामगृह जालना येथे आगमन व राखीव.

शनिवार, दि. १५ ऑगस्ट, २०२६ रोजी सकाळी ९ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथील भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त आयोजीत शासकीय ध्वजारोहण कार्यक्रमास उपस्थित राहतील. त्यानंतर सकाळी ९.३५ वाजता शासकीय वाहनाने परळी वैजनाथ जिल्हा बीडकडे प्रयाण करतील.

# संपादकीय

## डिजिटल दुनियेतील नवे पर्व

अलीकडेच भारताने डिजिटल क्रांतीच्या प्रक्रियेमध्ये एक एतिहासिक पाऊल टाकले. आता एटीएममधून पैसे काढण्यासाठी प्लास्टिक कार्डची गरज उरलेली नाही. मोबाईल आणि यूपीआयच्या साहाय्याने कार्डशिवाय थेट एटीएममधून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. ही सुविधा म्हणजे केवळ तांत्रिक सुधारणा नसून भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. भारतातील बँकिंग आणि आर्थिक व्यवहारांची पद्धत गेल्या दशकात आमूलाग्र बदलली आहे. एके काळी बँकेच्या शाखेत जाऊन पैसे काढण्यासाठी तासनतास रांगेत उभे रहावे लागायचे. त्यानंतर एटीएम यंत्रणा आली आणि ग्राहकांच्या आयुष्यात मोठी सोय निर्माण झाली. मात्र तंत्रज्ञानाची वाटचाल येथेच थांबली नाही. भारताने आणखी एक ऐतिहासिक पाऊल टाकले आहे. आता एटीएममधून पैसे काढण्यासाठी प्लास्टिक कार्डची गरज उरलेली नाही. मोबाईल आणि यूपीआयच्या साहाय्याने कार्डशिवाय थेट एटीएममधून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. ही सुविधा म्हणजे केवळ तांत्रिक सुधारणा नसून भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. भारताने जगाला यूपीआयच्या माध्यमातून डिजिटल व्यवहारांचे एक अद्वितीय मॉडेल दिले. यूपीआयने अगदी चहाच्या टपरीपासून मोठ्या शॉपिंग मॉलपर्यंत सर्वत्र व्यवहारांची पद्धत बदलून टाकली. आता त्याच यूपीआयचा वापर करून एटीएममधून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे बँकिंग क्षेत्र अधिक सुरक्षित, सुलभ आणि सर्वसमावेशक बनले आहे. कार्डलेस एटीएम म्हणजे अशी यंत्रणा ज्यामध्ये ग्राहकाला पैसे काढण्यासाठी एटीएम कार्ड मशीनमध्ये टाकावे लागत नाही. ग्राहक आपल्या मोबाईलवरील यूपीआय अनुप्रयोगाचा वापर करून एटीएमशी संवाद साधतो आणि काही सेकंदांमध्ये रोख रक्कम प्राप्त करतो. या प्रक्रियेमुळे कार्ड बाळगण्याची गरज संपते आणि अनेक प्रकारच्या फसवणुकीपासून संरक्षण मिळते.

या सुविधेची कार्यपद्धती अत्यंत सोपी आहे. ग्राहक एटीएमच्या पडद्यावर रोख रक्कम काढण्याचा पर्याय निवडतो. त्यानंतर आवश्यक रक्कम नमूद करतो. एटीएम मशीन लगेच एक विशेष क्यूआर कोड तयार करते. ग्राहक आपल्या मोबाईलमधील यूपीआय प्स उघडून हा कोड स्कॅन करतो. त्यानंतर यूपीआय पासवर्ड टाकून व्यवहाराला मंजुरी देतो. काही क्षणांमध्ये एटीएममधून रोख रक्कम बाहेर येते. संपूर्ण प्रक्रियेत कार्डचा वापर होत नाही आणि कोणत्याही अतिरिक्त उपकरणाची आवश्यकता रहात नाही. सामान्य नागरिकांसाठी ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. अनेकदा आपण एटीएम कार्ड घरी विसरतो किंवा ते पाकिटासह हरवते. अशा वेळी अचानक पैशांची गरज भासल्यास मोठी अडचण निर्माण होते. कार्डलेस एटीएममुळे ही समस्या पूर्णपणे दूर होते. आज बहुतांश लोकांकडे स्मार्टफोन असतो आणि त्यावर यूपीआय प्स सक्रिय असतो. त्यामुळे केवळ मोबाईलच्या सहाय्याने पैसे काढणे शक्य होते. सायबर गुन्हेगारीच्या वाढत्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर ही सुविधा अधिक महत्त्वाची ठरते. गेल्या काही वर्षांमध्ये एटीएम स्किमिंग, कार्ड क्लोनिंग आणि डेटा चोरीच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढल्या होत्या. काही गुन्हेगार एटीएममध्ये गुप्त उपकरणे बसवून कार्डची माहिती चोरत आणि त्याद्वारे बनावट कार्ड तयार करत. परिणामी ग्राहकांच्या खात्यातील पैसे लुटले जात. कार्डलेस व्यवहारांमध्ये कार्डच वापरले जात नसल्यामुळे अशा प्रकारच्या गुन्ह्यांना मोठ्या प्रमाणात आळा बसतो. त्यामुळे ग्राहकांचा विश्वास वाढतो आणि बँकिंग व्यवहार अधिक सुरक्षित बनतात.

आज देशातील लाखो नागरिक यूपीआयचा वापर करतात; परंतु अनेकांकडे एटीएम कार्ड नसते किंवा त्याचा वापर करण्याची सवय नसते. मोबाईलच्या माध्यमातून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे डिजिटल व्यवहार आणि पारंपरिक रोख व्यवहार यांच्यातील दरी कमी होते. ग्रामीण भागातील नागरिक अधिक आत्मविश्वासाने बँकिंग सेवांचा वापर करू शकतात. ज्येष्ठ नागरिकांसाठीही कार्डलेस एटीएम वरदान ठरू शकते. अनेकदा वयोमानानुसार एटीएम कार्ड हाताळणे, कार्डचा पासवर्ड लक्षात ठेवणे किंवा मशीनमध्ये कार्ड योग्य प्रकारे वापरणे कठीण जाते. मोबाईलवरील परिचित यूपीआय प्स वापरून व्यवहार करणे तुलनेने सोपे वाटू शकते. योग्य मार्गदर्शन मिळाल्यास ज्येष्ठ नागरिकांना या सुविधेचा मोठा लाभ होऊ शकतो. एकापेक्षा जास्त बँक खाती असलेल्या ग्राहकांसाठी ही सुविधा आणखी उपयुक्त आहे. पूर्वी वेगवेगळ्या खात्यांसाठी अनेक कार्ड सांभाळावी लागत. आता एकाच यूपीआय अनुप्रयोगामध्ये विविध खाती जोडलेली असल्यास आवश्यक त्या खात्यातून थेट पैसे काढता येतात.

विशेष म्हणजे भारताने या क्षेत्रात जगासमोर एक वेगळे उदाहरण निर्माण केले आहे. अनेक विकसित देशांमध्ये कार्डशिवाय पैसे काढण्याच्या सुविधा उपलब्ध असल्या तरी त्या बहुधा विशिष्ट बँकेपुरत्या मर्यादित असतात. भारताने मात्र सर्व बँका, सर्व यूपीआय प्स आणि सर्वसामान्य नागरिक यांना जोडणारी एक सार्वत्रिक आणि परस्परसंवादी व्यवस्था विकसित केली आहे. त्यामुळे कोणत्याही बँकेचा ग्राहक कोणत्याही सक्षम एटीएमवर जाऊन यूपीआयच्या साहाय्याने पैसे काढू शकतो. ही संकल्पना जागतिक स्तरावर अत्यंत अभिनव मानली जाते. डिजिटल भारत मोहिमेला या सुविधेमुळे मोठी चालना मिळाली आहे. डिजिटल व्यवहारांमध्ये भारताने आधीच जागतिक नेतृत्व प्राप्त केले आहे. यूपीआय व्यवहारांची संख्या आणि त्याचा व्यापक वापर पाहता अनेक देश भारताच्या अनुभवातून शिकण्याचा प्रयत्न करत आहेत. कार्डलेस एटीएम ही त्याच यशस्वी प्रवासातील पुढची पायरी आहे. आर्थिक सर्वसमावेशकतेच्या दृष्टीनेही या सुविधेचे महत्त्व मोठे आहे. बँकिंग सेवा प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचवणे हे कोणत्याही विकसित अर्थव्यवस्थेचे ध्येय असते. डिजिटल साधनांच्या मदतीने नागरिकांना अधिक सक्षम करणे आणि त्यांना वित्तीय प्रणालीशी जोडणे हे या तंत्रज्ञानामुळे अधिक सुलभ झाले आहे. गावातील शेतकरी, छोटा व्यापारी, विद्यार्थी, गृहिणी किंवा ज्येष्ठ नागरिक प्रत्येकाला याचा थेट लाभ होऊ शकतो. भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता, आवाजावर आधारित सेवा आणि प्रादेशिक भाषांमधील संवाद यांचा वापर वाढल्यास कार्डलेस एटीएम आणखी लोकाभिमुख होतील.

# २१ ऑगस्टला जलसंधारण दिनानिमित्त आयोजित 'महा वॉकेथॉन'मध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हा : मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांचे आवाहन

मुंबई, दि. १२ : येत्या २१ ऑगस्ट रोजी संपूर्ण महाराष्ट्रात जलसंधारण दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार असून, मुंबईतील राज्यस्तरीय मुख्य कार्यक्रमासह सर्व जिल्ह्यांच्या ठिकाणी एकाच वेळी 'महा वॉकेथॉन २०२६ – वॉक फॉर वॉटर' चे आयोजन करण्यात आले आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते या स्पर्धेच्या लोगोचे अनावरण करण्यात आले. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी या दोन्ही उपक्रमांमध्ये राज्यातील युवक–युवती आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे, अशी माहिती मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी दिली.

मंत्री संजय राठोड यांनी सांगितले की, महाराष्ट्राच्या जलसंधारण क्षेत्राला दूरदृष्टी आणि व्यापक दिशा देणारे माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त २१ ऑगस्ट हा दिवस 'जलसंधारण दिन' म्हणून साजरा करण्यात येत असून, त्यांच्या जलसंधारणविषयक योगदानाचे स्मरण करत राज्यभर विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यावर्षीच्या जलसंधारण दिनाचा मुख्य संदेश माती वाचवा, पाणी जपा, सुरक्षित भविष्य घडवा असा आहे.

**१५ ऑगस्टपासून 'जलसंधारण सप्ताह'**

१५ ऑगस्टपासून राज्यात 'जलसंधारण सप्ताह' सुरू होणार असून, २१ ऑगस्टपर्यंत शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायती, स्थानिक स्वराज्य संस्था आणि सामाजिक संस्थांच्या माध्यमातून मृद व जलसंधारण, पाणी बचत, भूजल पुनर्भरण, पावसाच्या पाण्याचे संकलन तसेच नदी–ओढ्यांच्या स्वच्छतेसंदर्भात विविध जनजागृती उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

जलसंधारण सप्ताहानंतरही या उपक्रमांमध्ये सातत्य राखत 'जलसंधारण अभियान' म्हणून २६ जानेवारी २०२७ पर्यंत जिल्हास्तरावर विविध जनजागृती व लोकसहभागाचे उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या माध्यमातून मृद व जलसंधारणाचा संदेश दीर्घकाळ जनमानसात रुजवून जलसंधारणाला व्यापक लोकचळवळीचे स्वरूप देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

२१ ऑगस्टला संपूर्ण राज्यात 'महा वॉकेथॉन'

२१ ऑगस्ट रोजी सकाळी संपूर्ण महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांच्या ठिकाणी एकाच वेळी ३ कि.मी. स्पर्धात्मक 'महा वॉकेथॉन' आयोजित करण्यात येणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात किमान १० हजार नागरिकांच्या सहभागाचे लक्ष्य ठेवण्यात आले असून, राज्यभरातून ३ लाखांपेक्षा अधिक नागरिकांचा प्रत्यक्ष सहभाग अपेक्षित आहे.

या उपक्रमासाठी क्यूआर कोडद्वारे ऑनलाइन नोंदणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असून, पात्र सहभागींना ई–प्रमाणपत्र देण्यात येईल. सहभागी नागरिकांना मृद व जलसंधारणाच्या कार्याशी सातत्याने जोडण्यासाठी 'जलदूत' ही ओळख देण्याची संकल्पनाही या अभियानाचा भाग आहे. कार्यक्रमाच्या प्रारंभी सर्व सहभागी नागरिक सामूहिक मृद व



जलसंधारण शपथ घेतील. पाण्याचे महत्त्व जनतेपर्यंत पोहोचविणे, माती व पाण्याच्या संवर्धनाबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे आणि मृद व जलसंधारणाच्या कार्यात व्यापक लोकसहभाग वाढविणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. जलसंधारण मंत्री संजय राठोड म्हणाले, हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर माती आणि पाण्याचे संवर्धन ही काळाची गरज आहे. प्रत्येक नागरिकाने पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे महत्त्व ओळखून या महा वॉकेथॉनमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे आणि मृद व जलसंधारणाचा संदेश घराघरात पोहोचवावा.

विजेत्यांसाठी आकर्षक बक्षिसे

महा वॉकेथॉनमध्ये जिल्हास्तरावर प्रथम क्रमांकासाठी २५ हजार व गौरवचिन्ह, द्वितीय क्रमांकासाठी १५ हजार व गौरवचिन्ह आणि तृतीय क्रमांकासाठी ११ हजार व गौरवचिन्ह अशी प्रोत्साहनपर बक्षिसे प्रस्तावित आहेत.तसेच सहभागी नागरिकांसाठी भाग्यवान सोडतीच्या माध्यमातून विशेष प्रोत्साहनपर पुरस्कार देण्याचे नियोजन आहे. प्रायोजक अथवा सामाजिक उत्तरदायित्व निधीतून सहभाग उपलब्ध झाल्यास आणखी आकर्षक प्रोत्साहनपर बक्षिसांचा समावेश करता येणार आहे.

युवकांसाठी 'रील फॉर सॉईल अँड वॉटर चॅलेंज'

जलसंधारण दिनाच्या अभियानाला डिजिटल माध्यमातून व्यापक लोकचळवळीचे स्वरूप देण्यासाठी 'रील फॉर सॉईल अँड वॉटर चॅलेंज' हा विशेष उपक्रमही राबविण्यात येणार आहे. राज्यातील १५ ते ३० वयोगटातील युवक–युवतींसाठी ही जिल्हास्तरीय स्पर्धा असेल. सहभागी युवक–युवतींना मृद व जलसंधारणाचा संदेश देणारी ३० ते ६० सेकंदांची इन्स्टाग्राम रील तयार करता येईल. संपूर्ण राज्यासाठी एकच अधिकृत हॅशटॅग डर्रींशडेळश्रडर्रींशथरींशी वापरण्यात येणार असून, प्रत्येक जिल्ह्यातून किमान २५० रील्स आणि राज्यभरातून १० हजार रील्सचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या माध्यमातून लाखो नागरिकांपर्यंत डिजिटल स्वरूपात मृद व जलसंधारणाचा संदेश पोहोचविण्याचा प्रयत्न आहे. रील स्पर्धेत प्रत्येक जिल्ह्यात प्रथम पुरस्कार २५ हजार व गौरवचिन्ह, द्वितीय पुरस्कार १५ हजार व गौरवचिन्ह आणि तृतीय पुरस्कार १० हजार व गौरवचिन्ह प्रस्तावित आहे. पात्र सहभागींना ई–प्रमाणपत्र तसेच विजेत्यांना विशेष युवा मृद–जलदूत म्हणून गौरविण्यात येणार आहे.

शासनाची जलसंधारण कामगिरीही जनतेसमोर

जलसंधारण सप्ताह आणि महा वॉकेथॉनच्या माध्यमातून शासनाच्या विविध मृद व जलसंधारण योजनांची माहितीही जनतेपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. यामध्ये जलयुक्त शिवार अभियान २.०, गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार, अमृत सरोवर, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना–पाणलोट विकास घटक २.० यासह विविध मृद व जलसंधारण कामे, यशस्वी प्रकल्प आणि लाभार्थी यशोगाथांचा समावेश असेल.

कोण कोण सहभागी होणार?

या राज्यव्यापी उपक्रमात लोकप्रतिनिधी, विद्यार्थी, युवक–युवती, महिला, शासकीय अधिकारी–कर्मचारी, राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी), राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस), माय भारत, क्रीडा संस्था, सामाजिक व स्वयंसेवी संस्था, उद्योग क्षेत्र, खेळाडू, कलाकार, विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि सामान्य नागरिकांचा व्यापक सहभाग अपेक्षित आहे.

प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरीय समन्वय करण्यात येणार आहे. मुंबईतील राज्यस्तरीय मुख्य कार्यक्रमाला मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्री, लोकप्रतिनिधी तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि कलाकारांचा सहभाग अपेक्षित आहे.

आपल्या पुढच्या पिढीसाठी माती आणि पाणी जपणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. महा वॉकेथॉनमध्ये सहभागी व्हा, रील स्पर्धेत सहभागी व्हा आणि मृद व जलसंधारणाचा संदेश महाराष्ट्राच्या घराघरात पोहोचवा. एक पाऊल जलसंधारणासाठी टाकूया आणि लाखो पाऊले सुरक्षित भविष्यासाठी एकत्र चालूया, असे आवाहन मंत्री संजय राठोड केले आहे.

## वन्य प्राण्यांमुळे होणाऱ्या नुकसानाची भरपाई वाढविण्याचा विचार

मुंबई : हत्ती व अन्य वन्यप्राण्यांमुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याबरोबरच वन्यप्राण्यांमुळे होणाऱ्या नुकसानीसाठी शेतकऱ्यांना देण्यात येणारी नुकसान भरपाई व्यवहार्य दृष्टिकोनातून वाढविण्याबाबत कार्यवाही करावी, असे निर्देश वनमंत्री गणेश नाईक यांनी दिले.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी मतदारसंघातील हत्ती व अन्य वन्यप्राण्यांमुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान, दोडामार्ग तालुक्यातील वन्यजीव संवर्धनासाठी अधिसूचित केलेल्या जागेचा वापर तसेच सावंतवाडी तालुक्यातील आरोंदा येथील कांदळवन बोर्डवॉक व इंटरप्रिटेशन सेंटरच्या रखडलेल्या कामांना गती देण्याबाबत वनमंत्री गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीत तिन्ही विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विविध प्रश्नांबाबत खासदार सुनील तटकरे, आमदार दीपक केसरकर आणि आमदार निलेश राणे यांनी निवेदनाद्वारे मागण्या मांडल्या होत्या. या अनुषंगाने झालेल्या बैठकीस आमदार दीपक केसरकर, आमदार निलेश राणे तसेच वन विभागाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

हत्तींच्या उपद्रवावर प्रभावी उपाययोजना

पश्चिम महाराष्ट्रात बिबट्यांचा, तर कोकणात हत्तींचा उपद्रव वाढला आहे. हत्तींच्या उपद्रवामुळे शेतजमिनीचे नुकसान होता कामा नये, यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, असे वनमंत्री नाईक यांनी सांगितले. वन्यप्राण्यांमुळे होणाऱ्या नुकसानीची भरपाई देताना शेतकऱ्यांचा व्यावहारिक दृष्टिकोनातून विचार करून नुकसान भरपाईच्या रकमेत आवश्यक वाढ करण्याबाबत कार्यवाही करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. सिंधुदुर्ग जिल्ह्यात हत्तींच्या उपद्रवावर तातडीने नियंत्रण मिळविण्यासाठी प्रशिक्षित कर्मचाऱ्यांना ट्रँक्विलायझरची सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतही कार्यवाही करण्याचे निर्देश मंत्री नाईक यांनी दिले.

## जावु तिथे जाऊ

तुकाराम मुंढे सध्या अन्न व औषध प्रशासन विभागात आहेत. मुंढेंनी महाराष्ट्रातील अनेक मातब्बर ब्रँड, आस्थापनांना काळ्या यादीत टाकलं आहे. विविध ठिकाणी धाडी टाकून उत्पादन थांबवणं, पूर्ण आस्थापना 'सील' करणं, निकष मोडणाऱ्या बाबींवरून खटले दाखल करणं याचा त्यांनी सपाटाच लावला आहे. त्यांना ज्या विभागात पाठवलं जातं, तिथे ते शांत बसतच नाहीत. काही ना काही कारणाने चर्चेत येतातच. सध्या बहुचर्चित असलेल्या 'जेन झी'च्या आंदोलनाचं नेतृत्व करणारा अभिजीत दीपके हा तरुण महाराष्ट्राचा असल्याने देशातील माध्यमं महाराष्ट्राची वेगळ्या पद्धतीने नोंद घेत असताना महाराष्ट्राचे डोळे सध्या दिपले आहेत, ते मात्र तुकाराम मुंढे या सनदी अधिकाऱ्याच्या कामगिरीने. मुंढे यांची २१ वर्षांची संपूर्ण कारकीर्द वादळी आहे. त्यांना ज्या विभागात पाठवलं जातं, तिथे ते शांत बसतच नाहीत. काही ना काही कारणाने चर्चेत येतातच. मुंढे यांची महाराष्ट्रात पहिली प्रसिद्धी आहे, ती त्यांच्या वारंवार होणाऱ्या बदल्यांनी. राज्यात सरकार कुणाचंही असो, मुख्यमंत्री कोणीही असो, मुंडेंना कधीच कुठल्या विभागात वर्षभर ठेवता येत नाही! त्यांच्यावर भ्रष्टाचार, अनियमिततेचे आरोप होत नाहीत. नियमबाह्य कामाबाबत त्यांच्यावर कुठे ठपका नाही. ठपका असलाच, तर काळवेळ न पाहता प्रत्येक गोष्ट नियमातील शब्दांनुसार घेण्याबाबत आहे. नियमावली आणि कायदा ते फक्त शब्दार्थाने जाणतात. भावार्थ समजून घेण्याच्या भानगडीत पडत नाहीत. त्यामुळे, त्यांचा कारभार अनेकदा आततायी होतो. लोकप्रतिनिधी, संबंधित विभागाला त्याचीच अडचण होऊ लागते. परिस्थितीनुरूप कायदे लवचिकपणे वाकवण्याची सवय झालेल्या सगळ्यांनाच त्याचा त्रास होतो. मुंढे यांच्या विरोधातल्या तक्रारींना तिथून सुरुवात होते. मुंढे डावं–उजवं करण्याच्या फंदात पडत नाहीत. समोर आलेली फाईल कोणाशी, कशाशी संबंधित आहे, याचाही विचार करत नाहीत. त्यामुळे, त्यांच्यावर आप–परभावाचा आरोपही करता येत नाही. लोकशाहीत प्रशासन जनतेला जबाबदार असतं. लोकप्रतिनिधी हे जनतेचे प्रतिनिधी असतात. त्यांच्या भूमिका, त्यांची बाजू समजून घेण्याची गरज मुंडे यांना वाटत नाही. ते कोणाला भेटत नाहीत. बहुतेक वेळा कोणाचे फोन घेत नाहीत; कोणाला उलट फोन करत नाहीत, अशी त्यांच्या वर्तणुकीबाबतच्या तक्रारींची बरीच मोठी यादी आहे. ती सहसा बातम्यांत येत नाही. सर्वसामान्य माणसाला प्रशासनाचा जो अनुभव येतो, त्या तुलनेत मुंढेंची शैली त्याला फार भारी वाटते. मुंढेंसारखा नि:स्पृह अधिकारी नाही, अशीच त्यांची प्रतिमा झाली आहे. आषाढी वारीदरम्यान काहींनी त्यांच्या नांवाचा योग साधून त्यांना थेट 'आधुनिक संतश्रेष्ठ तुकाराम महाराजां'ची उपमा दिली. काहींनी त्यांच्या प्रतिमेला दुधाचा अभिषेक केला. त्यांच्यावर मराठीत येऊ घातलेल्या पुस्तकाच्या एक लाख प्रतींची नोंदणी प्रकाशनापूर्वीच झाली आहे, असं म्हणतात. एखाद्या अधिकाऱ्याच्या वाटेला क्वचितच येणारं हे स्तुतीगानही टोकाचंच म्हणावं लागेल. मुंढे सध्या अन्न व औषध प्रशासन विभागात आहेत. तिथे असलेल्या अधिकारांचा उपयोग करून त्यांनी महाराष्ट्रातील अनेक मातब्बर ब्रँड, आस्थापनांना काळ्या यादीत टाकलं आहे. विविध ठिकाणी धाडी टाकून उत्पादन थांबवणं, पूर्ण आस्थापना 'सील' करणं, निकष मोडणाऱ्या बाबींवरून खटले दाखल करणं याचा त्यांनी सपाटाच लावला आहे. मुंबईतल्या जुन्या, प्रसिद्ध ब्रँडना टाळी ठोकल्याने, मोठमोठ्या–मातब्बर क्लबना नियम भंगांच्या आरोपाखाली खेचल्याने, अनेक सरकारी–न्यायालयीन इमारतींतील उपाहारगृहांनाही कायद्याचा बडगा दाखवल्याने अनेक प्रतिष्ठितांचे धाबे दणाणले आहेत. शाळांच्या आवारात आणि शाळांच्या आवारापासून ५० मीटरपर्यंतच्या परिसरात 'जंक फुड'ला बंदी केल्याने मुंढे आता मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या रडारवर आले असतील. 'जेथे जाऊ तेथे देऊ खळबळ उडवून' या बाण्याने मुंढेंचं काम सुरू असलं, तरी त्यामुळे प्रशासनाच्या वरिष्ठ वर्तुळात नेहमीच **क्रमशः**

# धरण क्षेत्रात मत्स्य व्यवसाय विकासासाठी सर्वेक्षण करणार

मुंबई : जलसंपदा विभाग आता मत्स्य व्यवसाय विकास विभागाशी सहकार्य आणि समन्वय वाढवणार आहे. धरण क्षेत्रात मासेमारीसाठी स्थानिक मच्छीमारांना प्राधान्य देता यावे यादृष्टीने जलसंपदा विभाग आणि मत्स्य व्यवसाय विकास विभाग समन्वय राखून काम करणार आहेत. लवकरच दोन्ही विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश असलेली संयुक्त समिती आवश्यक त्या सर्वेक्षणाची कामं करणार आहे अशी माहिती जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली यावेळी मत्स्य व्यवसाय विकास मंत्री नितेश राणे, आमदार प्रकाश सावंत, प्रधान सचिव रामास्वामी एन, सचिव लाभक्षेत्र विकास प्रकाश मिसाळ, मत्स्य व्यवसाय विकास आयुक्त प्रेरणा देशभ्रतार , जलसंपदा आणि मत्स्य व्यवसाय विकास विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी उजनी धरणातील मासेमारी विकासासाठी प्रक्रिया राबवली जात असल्याचे विखे पाटील म्हणाले. त्यांनी मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रात कोणकोणत्या ठिकाणी धरण क्षेत्रांमध्ये मासेमारी करणे शक्य आहे याचा अंदाज घेण्यासाठी जलसंपदा विभाग आता मत्स्य व्यवसाय विकास विभाग संयुक्त सर्वेक्षण करणार असल्याचे सांगितले. यासाठी दोन्ही विभागातील अधिकाऱ्यांची संयुक्त सर्वे




क्षण समिती स्थापन करणार असल्याचेही जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितले. यासाठी जलसंपदा विभागाच्या चारही मुख्य अभियंता यांना जबाबदारी देण्यात येत असून गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ आणि कृष्णा खोरे विकास महामंडळ यामधील धरणांमध्ये मासेमारीच्या दृष्टीने आवश्यक माहिती एकत्रित केली जाईल, असे ते म्हणाले. जलसंपदा विभागाशी समन्वय राखण्यासाठी मत्स्य व्यवसाय विकास आयुक्त यांना जबाबदारी देण्यात येत आहे. मत्स्य व्यवसाय विभागाच्या वतीने जवळपास २५०० धरण आणि तलाव यातील मासेमारीसाठी मच्छीमारांच्या सहकारी संस्थांना संधी दिली जाते. विभागाने याबाबत पारदर्शक व आधुनिकता आणण्यासाठी डिजिटायझेशन, मॅपिंग केले आहे आणि रियल टाईम डाटा सर्वेलान्स प्रणाली कार्यरत केली आहे. जलसंपदा विभागाच्या विविध धरणांमध्ये देखील स्थानिक मच्छीमारांना मासेमारीसाठी संधी मिळावी यादृष्टीने विभाग प्रयत्नशील आहे असे मत्स्य व्यवसाय विकास मंत्री नितेश राणे म्हणाले. जलसंपदा विभागाच्या अंतर्गत धरणांमधील गाळ काढण्यासाठी व जल साठवण क्षमता वाढविण्यासाठी कार्यवाही केली जाते त्यामध्ये मत्स्य व्यवसाय विभागाच्या अखत्यारीत असलेल्या धरणातील व तलावातील गाळ काढण्यासाठी देखील सहकार्य मिळावे असे मंत्री नितेश राणे म्हणाले. यावेळी गोड्या पाण्यातील मासेमारी, सहकारी मच्छीमार संस्था, तलावातील मासेमारीसाठी ठेका पद्धती, दोन्ही विभागांशी संबंधित विविध बाबी, मासेमारीसाठी राबविण्यात येणारी प्रक्रिया आदी विषयाबाबत चर्चा झाली.

हे पत्रक मालक,मुद्रक, प्रकाशक शामसुंदर चितोडा यांनी **जगमित्र ऑफसेट भोकरदन नाका संभाजी नाका, ता.जि.जालना ४३१२०३ (महाराष्ट्र)** येथे छापून, दैनिक चकमक कार्यालय जालना येथे प्रसिध्द केले. पि.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय यांची राहील. **संपादक शामसुंदर चितोडा, कार्यकारी संपादक कैलास फुलारी** (जालना जिल्हा न्यायालयाअंतर्गत) RNI NO. MHMAR/26/A4110 मो.९४२२७९६०८८, ९४०३४९४४२

# अशासकीय अनुदानित महाविद्यालयांसाठी 'ई-ऑफिस प्रणाली'चे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते लोकार्पण

मुंबई, दि. १२ : उच्च शिक्षण संचालनालयाच्या कार्यक्षेत्रातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयांचे प्रशासकीय कामकाज अधिक गतिमान, पारदर्शक, सुरक्षित आणि कागदरहित करण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या 'ई-ऑफिस प्रणाली'चे लोकार्पण उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, उपसचिव प्रताप लुबाळ, उपसचिव अशोक मांडे, सहासंचालक डॉ अर्चना बोऱ्हाडे व संबंधित अधिकारी उपस्थित होते.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, या प्रणालीमुळे राज्यातील १,२३१ अशासकीय अनुदानित महाविद्यालयांचे प्रशासकीय कामकाज डिजिटल माध्यमातून अधिक सुलभ आणि कार्यक्षम होणार आहे. ई-ऑफिस प्रणालीमुळे महाविद्यालये, विभागीय सहसंचालक कार्यालये, उच्च शिक्षण संचालनालय तसेच मंत्रालयातील उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्यातील पत्रव्यवहार आणि प्रशासकीय प्रक्रिया डिजिटल माध्यमातून सुलभ होणार आहेत. शासकीय कामकाजात संगणकाचा अधिकाधिक वापर करून कामकाज गतिमान करणे, दस्तऐवज व माहिती सुरक्षित ठेवणे आणि निर्णय प्रक्रिया अधिक जलद व परिणामकारक करणे हा या प्रणालीमागील प्रमुख उद्देश आहे.उच्च शिक्षण संचालनालयाच्या कार्यक्षेत्रात कला, वाणिज्य, विज्ञान, विधि, शिक्षणशास्त्र, शारीरिक शिक्षण आणि समाजकार्य आदी विविध शाखांची एकूण १,२३१ अशासकीय अनुदानित महाविद्यालये आहेत. या महाविद्यालयांमधून संबंधित



विभागीय कार्यालये आणि मंत्रालयाशी मोठ्या प्रमाणावर पत्रव्यवहार व प्रशासकीय कामकाज केले जाते. पारंपरिक पद्धतीमध्ये कागदपत्रांचे स्कॅनिंग, टपालाद्वारे पत्रव्यवहार, कागदपत्रांची हाताळणी आणि फाईलच्या पाठपुराव्यासाठी लागणारा वेळ, मनुष्यबळ व खर्च यामुळे प्रशासकीय प्रक्रियेला विलंब होतो. ई-ऑफिस प्रणालीमुळे या अडचणी दूर होऊन कामकाजाला डिजिटल गती मिळणार आहे. असेही मंत्री चंद्रकातदादा पाटील यांनी सांगितले.या उपक्रमांतर्गत प्रत्येक महाविद्यालयासाठी स्वतंत्र ई-ऑफिस उपलब्ध करून देण्यात आले असून ते संबंधित महाविद्यालयाच्या नावाने कार्यान्वित करण्यात येणार आहे. प्रत्येक महाविद्यालयाचे ई-ऑफिस 'सेवार्थ आयडी'शी संलग्न करण्यात आले आहे. त्यामुळे ई-फाईल, ई-टपाल, पत्रव्यवहार, प्रस्ताव, अहवाल आणि परिपत्रक यांचे व्यवस्थापन अधिक सुलभ, सुरक्षित आणि पारदर्शक पद्धतीने करता येणार आहे.ई-ऑफिस प्रणालीद्वारे अशासकीय अनुदानित महाविद्यालय, उच्च शिक्षण संचालनालय, विभागीय सहसंचालक कार्यालय, मंत्रालयातील उच्च व तंत्र शिक्षण विभाग अशा सर्व स्तरांवरील पत्रव्यवहार डिजिटल माध्यमातून जोडला जाणार आहे. महाविद्यालयाचे नाव किंवा सेवार्थ आयडी शोध निकष म्हणून वापरून संबंधित ई-टपाल, पत्र, प्रस्ताव, अहवाल अथवा परिपत्रक सहजपणे शोधता येणार आहे.या प्रणालीमुळे महाविद्यालयीन स्तरावरील प्रशासकीय प्रक्रियांचे डिजिटल रूपांतर होऊन पेपरलेस कार्यसंस्कृतीला चालना, कार्यक्षमता वाढ, फाईल नोंदींची तात्काळ उपलब्धता, कालबद्ध कार्यवाही, दस्तऐवजांचे सुरक्षित जतन आणि माहितीचा शोध व वापर अधिक सुलभ होणार आहे. तसेच प्रशासकीय कामकाजातील पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि जबाबदारी वाढण्यास मदत होणार आहे.ई-ऑफिसमुळे टपाल, स्कॅनिंग, कागदपत्रे आणि इतर आनुषंगिक खर्चात बचत होऊन पर्यावरणपूरक आणि शाश्वत प्रशासनाला चालना मिळणार आहे. त्याचबरोबर फाईलच्या हालचालींचे डिजिटल पद्धतीने व्यवस्थापन होत असल्याने निर्णय प्रक्रियेला अधिक वेग मिळणार आहे. उच्च शिक्षण क्षेत्रातील डिजिटल गव्हर्नन्स अधिक गतिमान, पारदर्शक, उत्तरदायी आणि कार्यक्षम करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल आहे. असेही मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सांगितले.

## भरती परीक्षा पद्धती सुधारणांसाठी राज्यात उच्चस्तरीय समिती : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई, दि. १२ : महाराष्ट्रात विविध सेवाभरतींसाठी होणाऱ्या परीक्षा पद्धतीत सर्वसमावेशक, अधिक सुरक्षित आणि सर्वसंमतीने सुधारणांसाठी एक उच्चस्तरीय समिती गठीत करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला. या समितीने राज्यात प्रत्येक विभागात जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधत सर्वंकष सुधारणांबाबत अहवाल सादर करायचा आहे. वर्षा निवासस्थानी आयोजित या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे देखील उपस्थित होते, त्यांनीही विविध उपयुक्त सूचना बैठकीत केल्या. ही उच्चस्तरीय समिती सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेत राहणार असून राज्याचे पोलीस महासंचालक सदानंद दाते, माहिती-तंत्रज्ञान विभागाचे सचिव वीरेंद्र सिंग, पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी आणि नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांचा त्यात समावेश असेल. या समितीने प्रत्येक महसुली विभागात जाऊन विद्यार्थी, शिक्षण संस्थाचालक आणि संबंधित घटकांशी चर्चा करून त्यांची मते जाणून घ्यायची आहेत. त्याआधारावर राज्यासाठीचे समग्र धोरण ठरविण्यात येईल अशी माहिती यावेळी देण्यात आली.

अलिकडेच केंद्र सरकारने



पेपरफूट आणि परीक्षा गैरव्यवहारासंदर्भात संसदेत कायदा केला आहे. महाराष्ट्राचाही स्वतंत्र कायदा आहेच. तथापि संसदेने केलेला कायदा अधिक कठोर असल्याने तो महाराष्ट्रातही लागू करण्यासंदर्भात येणाऱ्या पंधरवड्यात प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी, असेही निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिले.

राज्यात किमान २५ हजार सुरक्षित क्लासरुम उभारण्यात याव्यात, असेही निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिले. या विविध परीक्षांमध्ये जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक, शिक्षण विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांचीही समन्वय भूमिका, इतर विविध देशांमधील परीक्षा पद्धती, विद्यमान प्रक्रिया आणि त्यातील विविध संभाव्य सुधारणा अशा अनेक विषयांवर यावेळी सांगोपांग चर्चा झाली. राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल आणि इतर वरिष्ठ अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

## मावळ तालुक्यातील दरडग्रस्त गावांच्या पुनर्वसनासाठी प्रशासनाने गतीने कार्यवाही करावी : मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील

मुंबई, दि. १२ : पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील पाटण परिसरात अतिवृष्टीमुळे भूस्खलनाची घटना घडल्याच्या पार्श्वभूमीवर दरडग्रस्त तसेच दरडप्रवण गावांतील नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत पुनर्वसनाची कार्यवाही गतीने पूर्ण करावी, असे निर्देश मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी दिले. मंत्रालयात मावळ तालुक्यातील दरडग्रस्त व दरडप्रवण गावांच्या पुनर्वसनाबाबत आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी आमदार सुनील शेळके,उपसचिव संजय इंगळे, पुणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, जीएसआयच्या पुणे विभागाचे मेगाचेझ तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. मदत व पुनर्वसन मंत्री जाधव पाटील म्हणाले, दरडप्रवण भागातील नागरिकांच्या जीवितास कोणताही धोका निर्माण होणार नाही, यासाठी प्रशासनाने प्रतिबंधात्मक उपाययोजनांसोबतच कायमस्वरूपी पुनर्वसनाची कार्यवाही प्राधान्याने करावी. धोकादायक ठिकाणी वास्तव्यास असलेल्या कुटुंबांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर व पुनर्वसन करण्यासाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही तातडीने पूर्ण करावी. मावळ तालुक्यातील दरडप्रवण क्षेत्रात येणाऱ्या गावांच्या पुनर्वसनासाठी प्रशासनाने कार्यवाही सुरू केली आहे. संबंधित गावांची जीएसआयच्या वर्गवारीनुसार पाहणी करण्यात आली असून, काही गावांमध्ये पुनर्वसनासाठी आवश्यक जमीन व इतर बाबींची कार्यवाही पूर्ण झाली आहे. काही गावांचे पुनर्वसन प्रस्ताव मात्र अद्याप प्राप्त झालेले नसल्याचे बैठकीत निर्दर्शनास आले. दरडग्रस्त व दरडप्रवण गावांतील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने काम करावे. पुनर्वसनासाठी आवश्यक जमीन, तांत्रिक अहवाल, सर्वेक्षण, प्रशासकीय मान्यता आणि निधीशी संबंधित प्रस्तावांची कार्यवाही कोणत्याही विलंबाविना पूर्ण करावी, असे निर्देश मंत्री जाधव पाटील यांनी दिले. अतिवृष्टीच्या काळात दरडींचा संभाव्य धोका असलेल्या भागांवर प्रशासनाने सातत्याने लक्ष ठेवावे. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना तत्काळ राबवून सुरक्षित, कायमस्वरूपी आणि नियोजनबद्ध पुनर्वसनाला प्राधान्य द्यावे, असेही मंत्री जाधव पाटील यांनी स्पष्ट केले.

## शासनाची जलसंधारण कामगिरीही जनतेसमोर

जलसंधारण सप्ताह आणि महा वॉकेथॉनच्या माध्यमातून शासनाच्या विविध मृद व जलसंधारण योजनांची माहितीही जनतेपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. यामध्ये जलयुक्त शिवार अभियान २.०, गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार, अमृत सरोवर, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना-पाणलोट विकास घटक २.० यासह विविध मृद व जलसंधारण कामे, यशस्वी प्रकल्प आणि लाभार्थी यशोगाथांचा समावेश असेल.

कोण कोण सहभागी होणार?

या राज्यव्यापी उपक्रमात लोकप्रतिनिधी, विद्यार्थी, युवक-युवती, महिला, शासकीय अधिकारी-कर्मचारी, राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी), राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस), माय भारत, क्रीडा संस्था, सामाजिक व स्वयंसेवी संस्था, उद्योग क्षेत्र, खेळाडू, कलाकार, विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि सामान्य नागरिकांचा व्यापक सहभाग अपेक्षित आहे.

प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरीय समन्वय करण्यात येणार आहे. मुंबईतील राज्यस्तरीय मुख्य कार्यक्रमाला मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्री, लोकप्रतिनिधी तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि कलाकारांचा सहभाग अपेक्षित आहे. आपल्या पुढच्या पिढीसाठी माती आणि पाणी जपणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. महा वॉकेथॉनमध्ये सहभागी व्हा, रील स्पर्धेत सहभागी व्हा आणि मृद व जलसंधारणाचा संदेश महाराष्ट्राच्या घराघरात पोहोचवा. एक पाऊल जलसंधारणासाठी टाकूया आणि लाखो पाऊले सुरक्षित भविष्यासाठी एकत्र चालूया, असे आवाहन मंत्री संजय राठोड केले आहे.

## रस्त्यावर राहणाऱ्या बालकांच्या पुनर्वसनासाठी फिरते पथक योजना : महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे

मुंबई, दि. १२ : बाल भिक्षेकरी समस्येचे समूळ उच्चाटन करून या बालकांच्या पुनर्वसनासाठी राबविण्यात येत असलेली फिरते पथक योजना जलदगतीने कार्यान्वित करावी. यासाठी आवश्यक कार्यवाही तातडीने पूर्ण करावी, असे निर्देश महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले. महिला व बाल विकास मंत्री तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात यासंदर्भात बैठक झाली. यावेळी महिला व बाल विकास विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते. महिला व बाल विकास मंत्री तटकरे म्हणाल्या, रस्त्यावर राहणाऱ्या बालकांच्या पुनर्वसनासाठी राज्यात फिरते पथक योजना कायमस्वरूपी सुरु करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. राज्यातील २८ महानगरपालिका क्षेत्रांमध्ये प्रत्येकी एक पथक, तसेच बृहन्मुंबई शहर, मुंबई उपनगर पूर्व आणि मुंबई उपनगर पश्चिम यासाठी प्रत्येकी एक पथक, अशी एकूण ३१



फिरती पथके कार्यान्वित करण्यात येणार आहेत. या पथकांच्या निवड प्रक्रियेसह आवश्यक कार्यवाही तातडीने पूर्ण करून योजना प्रत्यक्ष कार्यान्वित करावी, असे निर्देश मंत्री आदिती तटकरे यांनी दिले. रस्त्यावर राहणाऱ्या बालकांचा शोध घेणे, त्यांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या पुनर्वसनासाठी आवश्यक उपाययोजना करणे, यासाठी ही पथके महत्त्वपूर्ण ठरणार आहेत. बालकांच्या हिताशी संबंधित असलेल्या या योजनेची अंमलबजावणी करताना अधिकाऱ्यांनी संवेदनशीलता आणि जबाबदारीने काम करावे. प्रत्येक बालकाला सुरक्षितता, संरक्षण आणि पुनर्वसनाची संधी मिळेल, यासाठी यंत्रणेने प्रभावीपणे काम करावे, असेही मंत्री तटकरे यांनी स्पष्ट केले.

पान १ वरून...

### त्या अवैध शस्त्रासाठी

येथील सीसीटीव्ही कॅमेरे टाळण्यासाठी पाल फाटा मार्गाची निवड केल्याचे पोलिसांनी सांगितले. तसेच शस्त्रांची विक्री करण्यासाठी तालुकास्तरावर एजंट नेमून त्यांचे नेटवर्क तयार करण्यात आले असल्याचेही तपासात निष्पन्न झाल्याचे पोलिसांनी म्हटले आहे. महाराष्ट्राबाहेरील नेटवर्कचा शोध फरार आरोपीची अटक, राजस्थानातील चितोडगड येथील हत्यार विक्रेत्याबाबत मिळालेली माहिती आणि ट्रॅव्हल्समार्फत झालेली पार्सल वाहतूक या धाग्यांच्या आधारे या गुन्ह्यामागील आंतरराज्यीय हत्यार पुरवठा साखळीचा शोध घेण्यात येत आहे. या दिशेने पोलिस निरीक्षक किरण बिडवे यांच्या पथकाकडून तपास सुरू आहे. चंदनझिरा पोलिसांची ही कारवाई अवैध हत्यारांच्या माध्यमातून गुन्हेगारीला बळ देणाऱ्या प्रवृत्तींना आळा घालण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानली जात आहे. या प्रकरणातील संपूर्ण हत्यार पुरवठा साखळीचा छडा लावण्यासाठी पोलिस तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक तेगबीरसिंग संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी व उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किरण बिडवे, पोउपनिरीक्षक रवि देशमाने, सफौ राजेंद्र ठाकूर, पोहेकॉ प्रशांत देशमुख, कृष्णा तंगे, अभिजीत वायकोस, पो.कॉ. सागर खैरे, गणेश नाईकवाड यांच्या पथकाने केली.

### विकासाचे प्रश्न मार्गी

सार्थ ठरवत शहराचा चेहरा - मोहरा बदलण्यासाठी महापौर, उपमहापौर आणि सर्व सभापती, नगरसेवकांनी प्रामाणिकपणे प्रयत्न करावेत अशी अपेक्षा त्यांनी शेवटी व्यक्त केली. यावेळी भास्कर दानवे यांनीही विकासाच्या मुद्द्यावर भर देऊन त्या दृष्टीने काम करण्याची अपेक्षा व्यक्त करून शुभेच्छा दिल्या. स्थायी समिती सभापती अशोक पांगारकर यांनी आपल्या प्रास्ताविकातून जालना मनपाचे उत्पन्न वाढवण्यासाठी काय उपाययोजना करता येतील यासाठी प्रयत्न सुरू असून आगामी काळात मनपाचे उत्पन्न किमान १०० कोटीपर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट असल्याचे स्पष्ट करून सर्वांना सोबत घेऊन जानेवारी २०२७ पर्यंत शहरातील जनतेला तिसऱ्या दिवशी पाणी पुरवठा करण्यासह स्वच्छ,सुंदर आणि हरित जालना करण्यासाठी निश्चितपणे प्रयत्न करणार असल्याची ग्वाही सभापती अशोक पांगारकर यांनी यावेळी दिली.या कार्यक्रमास अन्य नगरसेवक व पदाधिकारी उपस्थित होते.

पान ४ वरून...

### कुंचल्यातून उमटणाऱ्या

सोलाट, राम कदम, राम गायकवाड, विजय कुमठेकर, रावसाहेब ढवळे, जगत घुगे, यशवंत सोनुने, राम सावंत, नारायण बोराडे, विनोद जैतमहाल, शिवाजी मदन, बाबू श्रीरामे, जिजा वाघ, पंडित रानमाळ, कैलास भाले, संतोष लव्हटे आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

आता कोरा कागद... रेषा मागेल कुणाला? श्रीधर अंभोरे यांच्या जाण्याने त्यांच्या कुंचल्यातून साकार होणाऱ्या त्या वैशिष्ट्यपूर्ण 'श्रीधर रेषा' आता थांबल्या आहेत. साहित्यिकांच्या शब्दांना मुखपृष्ठावर दृश्यरूप देणारा, मोजक्या रेषांमधून मोठा आशय व्यक्त करणारा एक संवेदनशील कलावंत काळाच्या पडद्याआड गेला आहे. त्यांच्या कलाकृती आणि कला-साहित्य क्षेत्रातील योगदानाच्या रूपाने त्यांची स्मृती मात्र कायम जिवंत राहणार आहे.

### दिव्यांगाचे प्रश्न मार्गी

पालिकेच्या वतीने दिव्यांग बांधवांच्या घरकुलाचा प्रश्न सोडविण्यासाठी तसेच विविध समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न केला जाणार असून महानगर पालिकेच्या वतीने दिव्यांग बांधवांना सन्मान दिला जाईल, असे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविक करतांना राहूल मुळे म्हणाले की, जालना महानगर पालिका प्रशासन दिव्यांग बांधवांच्या प्रश्नांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असून त्यासाठी दिव्यांगानी सातत्याने आंदोलन केली आहेत. दिव्यांग बांधवांच्या प्रश्नांकडे महानगर पालिका प्रशासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे, दिव्यांगाच्या घरकुलाचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली.

प्रारंभी महापौर वंदना मगरे यांच्या हस्ते द्वीप प्रज्वलित करून या दिव्यांग मार्गदर्शन मेळाव्याचे उदघाटन करण्यात आले. संचलन व आभार प्रदर्शन आशिष रसाळ यांनी केले. यावेळी अपंग जनता दलाच्या महिला जिल्हाध्यक्ष संगीता कोरडे , रेणुका वाहुळकर ,सतिश वाघ, गजानन येऊल ,परमेश्वर सांगोळे , शाहरुख शहा, करण डोईफोडे , सविता बोराडे , दत्ता फुलझाडे, अनिल महापुरे आदींची उपस्थिती होती.

### भारतरत्न डॉ. बाबासाहेब

आपला Renewal (नूतनीकरण) अर्ज सादर केला नाही, तर संबंधित विद्यार्थी स्वाधार योजनेचा लाभ घेण्यास इच्छुक नाही, असे गृहीत धरून त्यांना स्वाधार योजनेचा लाभ भेटणार नाही. त्यामुळे पात्र विद्यार्थ्यांनी कोणतीही विलंब न करता लवकरात लवकर अर्ज सादर करावेत. अंतिम मुदतीची वाट न पाहता तात्काळ हारिपशु.ारहरळीं.ीस या संकेतस्थळावर जाऊन आपले नूतनीकरण (Renewal) अर्ज भरावेत व स्वाधार योजनेचा लाभ कायम ठेवावा. असे आवाहन डॉ. अनिता राठोड, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, जालना यांनी केले आहे.

### मृद व जलसंधारची

पध्दतीच्या बंधाऱ्याचे रुपातंर बॅरेजेस मध्ये करण्याची मागणी केली. प्रारंभी जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल यांनी एल निनोच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यासाठी तयार केलेल्या ७ सुत्री कार्यक्रमाची माहिती सादरीकरणांद्वारे सादर केली. यावेळी जिपचे कार्यकारी अभियंता, विभागीय वन अधिकारी, उप वन संरक्षक, प्रकल्प संचालक कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) मृद व जलसंधारण विभागाचे उपअभियंता यांची उपस्थिती होती.

## चिल्ड्रन एड सोसायटीच्या कामकाजाचा आढावा

मुंबई, दि. १२ : चिल्ड्रन एड सोसायटीचे २०२६-२०२७ हे शताब्दी वर्ष असून बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी मंत्रालयात आयोजित बैठकीत सोसायटीकडील कामकाजाचा आढावा घेतला.महिला व बालविकास मंत्री तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीस महिला व बाल विकास विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते.महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी चिल्ड्रन एड सोसायटीच्या जागेवरील अतिक्रमण तातडीने काढण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश देत जागा उपलब्धेतनुसार या ठिकाणी करण्यात येणाऱ्या कामाचा सुधारित आराखडा सादर करण्याबाबतही त्यांनी सूचित केले.

# पाणलोटातून शाश्वत शेतीकडे; अंबडमध्ये ५१.६० हेक्टरवर २३,७९० फळझाडांची लागवड

## पीएमकेएसवाय २.० अंतर्गत ६५ शेतकरी कुटुंबांना आर्थिक स्थैर्याची नवी दिशा

जालना/प्रतिनिधी : प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना (झचघड्ध २.०) अंतर्गत पाणलोट विकास घटक (थऊ‍ऊ-झचघड्ध २.०) मध्ये अंबड प्रकल्प क्रमांक १ अंतर्गत सन २०२४-२५ मध्ये राबविण्यात आलेल्या फळबाग लागवड उपक्रमाला चांगले यश मिळाले आहे. या उपक्रमातून ६५ शेतकऱ्यांच्या ५१.६० हेक्टर क्षेत्रावर तब्बल २३ हजार ७९० फळझाडांची लागवड करण्यात आली. या उपक्रमामुळे पारंपरिक शेतीला शाश्वत, अधिक उत्पन्न देणाऱ्या आणि पर्यावरणपूरक शेतीची जोड मिळाली आहे.







रोहिलागड, बदापूर, आवा, अंतरवाला, खेडगाव, चिकनगाव, कौचलवाडी तसेच इतर पाणलोट समिती क्षेत्रातील गावांमध्ये हा उपक्रम राबविण्यात आला. जलसंधारणाच्या कामांसोबत फळबाग लागवडीची सांगड घातल्याने शेतकऱ्यांना पाण्याचा कार्यक्षम वापर, जमिनीचे संवर्धन, उत्पादनवाढ आणि रोजगारनिर्मितीचा लाभ मिळत आहे.

५ प्रकारच्या फळझाडांची लागवड या उपक्रमांतर्गत विविध उच्चमूल्य फळपिकांना प्राधान्य देण्यात आले. त्यामध्ये डाळिंबाची १२ हजार ७०९, मोसंबीची ५ हजार ९४२, आंब्याची ३ हजार ९२०, सीताफळाची ७२० आणि पेरूची ४९९ रोपे असे एकुण २३ हजार ७९० रोपांची लागवड करण्यात आली. या फळबागांसाठी योजनेअंतर्गत ४३.०६ लाख रुपयांची गुंतवणूक करण्यात आली. पारंपरिक पिकांवर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांना फळपिकांकडे वळण्यासाठी या उपक्रमामुळे प्रोत्साहन मिळत आहे.

शेतकऱ्यांच्या उत्पन्नाला नवी दिशा डाळिंब, मोसंबी, आंबा, पेरू आणि सीताफळ यांसारख्या उच्चमूल्य फळपिकांमुळे भविष्यात शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्याची अपेक्षा आहे. फळबागांची लागवड ही एकदाच होणारी प्रक्रिया नसून तिच्या देखभालीसाठी वर्षभर विविध कामांची आवश्यकता असते. त्यामुळे छाटणी, सिंचन, तणनियंत्रण, खत व्यवस्थापन, औषध फवारणी, काढणी, वर्गीकरण आणि बाजारपेठेपर्यंत माल पोहोचविणे अशा विविध टप्प्यांवर स्थानिक रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत.

विशेषतः महिलांनाही फळबागांच्या देखभाल व काढणीसारख्या कामांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्याने ग्रामीण कुटुंबांच्या उत्पन्नाला हातभार लागला आहे. गावातच रोजगार उपलब्ध होण्यास मदत झाल्याने रोजगारासाठी होणारे स्थलांतर कमी करण्याच्या दृष्टीनेही हा उपक्रम महत्त्वाचा ठरत आहे.

मृद संधारण आणि भूजल पुनर्भरणाला चालना फळबागांमुळे जमिनीवर कायमस्वरूपी हिरवे आच्छादन तयार होत असल्याने मातीची धूप कमी होण्यास मदत होते. परिणामी सुपीक मातीचे संरक्षण होऊन जमिनीची उत्पादकता टिकविण्यास हातभार लागतो.

पाणलोट विकासाच्या कामांसोबत फळबाग लागवडीची सांगड घातल्यामुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यास मदत होत आहे. त्यामुळे भूजल पुनर्भरणाला चालना मिळून विहिरी व बोअरवेलमधील पाण्याची उपलब्धता सुधारण्यास मदत होत आहे. पाण्याचा काटकसरीने आणि नियोजनबद्ध वापर केल्यास फळबागांमुळे शेतकऱ्यांना दीर्घकालीन लाभ मिळण्याची शक्यता आहे.

२३ हजार ७९० झाडांमुळे पर्यावरणालाही फायदा फळबाग लागवडीचा फायदा केवळ शेतकऱ्यांच्या उत्पन्नापुरता मर्यादित राहिलेला नाही. २३ हजार ७९० फळझाडांमुळे परिसरातील हरितक्षेत्र वाढण्यास मदत झाली आहे. झाडांमुळे मातीचे संरक्षण, जैवविविधतेला चालना आणि कार्बन शोषणास हातभार लागत आहे. त्यामुळे जलसंधारणाबरोबरच पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीनेही हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरत आहे.

जलसंधारणासोबत फळबागेची यशस्वी सांगड अंबड प्रकल्प क्रमांक १ मधील हा उपक्रम केवळ फळझाडे लावण्यापुरता मर्यादित नसून जलसंधारण, नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन, शेतकरी उत्पन्नवाढ, रोजगार निर्मिती आणि पर्यावरण संवर्धन यांना एकत्रितपणे पुढे नेणारा उपक्रम ठरत आहे. पाणलोट क्षेत्रात उपलब्ध पाण्याचा योग्य वापर करून फळबागांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दीर्घकालीन आणि शाश्वत उत्पन्नाचा मार्ग उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न या माध्यमातून झाला आहे. पाणी साठे, झाडे वाढली, उत्पादनवाढीची आशा निर्माण झाली आणि शेतकऱ्यांच्या समृद्धीचा नवा मार्ग खुला झाला, अशी या उपक्रमाची वाटचाल आहे. झचघड्ध २.० अंतर्गत अंबड प्रकल्पातील फळबाग लागवड ही जलसंधारण आणि शाश्वत शेतीची प्रभावी सांगड घालणारी यशस्वी वाटचाल ठरत आहे.



जिल्हाधिकारी कार्यालयातील समोरच्या नुतन कमानीचे शुशोभीकरण करण्यात आले. यावेळी छायाचित्रकार किरण खानापुरे यांनी टिपलेले छायाचित्र

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेअंतर्गत नूतनीकरण अर्ज करण्याचे आवाहन

जालना : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेअंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी फक्त मागील वर्षी (२०२५-२६) स्वाधार योजनेचा अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांसाठी नूतनीकरण (ठशपशुरश्र) अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. पात्र विद्यार्थ्यांनी आपले ठशपशुरश्र (नूतनीकरण) अर्ज दिनांक १५ सप्टेंबर २०२६ पर्यंत अनिवार्यपणे ऑनलाईन सादर करावेत. अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत संपल्यानंतर कोणत्याही विद्यार्थ्यास अर्ज सादर करता येणार नाही किंवा अर्जामध्ये कोणताही बदल करता येणार नाही. अर्ज भरताना कोणतीही तांत्रिक अडचण उद्भवल्यास विद्यार्थ्यांनी अंतिम मुदतीपूर्वी संबंधित सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, जालना कार्यालयाशी संपर्क साधावा. विहित मुदतीत विद्यार्थ्यांनी **(पान ३ वर)**

## मृद व जलसंधारची कामे वेळेत पुर्ण करा : मंत्री संजय राठोड

जालना : मृद व जलसंधारण विभागाच्या माध्यमातून जालना जिल्ह्यात सुरु असलेली सर्व कामे वेळेत पूर्ण करावीत अशा सूचना राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात मृद व जलसंधारण विभागाशी संबंधित विविध विषयांचा आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी आमदार अर्जुन खोतकर,आमदार नारायण कुचे, आमदार हिकमत उढाण, आमदार संतोष दानवे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, उपजिल्हाधिकारी मनिषा दांडगे, मनिषा देशपांडे, मृद व जलसंधारण विभागाचे ओएसडी अनंत जगताप आणि देवेंद्र भामरे, मुख्य अभियंता हरिभाऊ गिते, अधिक्षक अभियंता अजितकुमार परांडे, कार्यकारी अभियंता नरेंद्र कटके, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी गहिनीनाथ कापसे, वरिष्ठ भूवैज्ञानिक सी. एच. गिरीधर यांची उपस्थिती होती. यावेळी मंत्री श्री. राठोड म्हणाले की, जिल्ह्यातील पाझर तलाव दुरुस्ती, जलसंधारणाच्या जुन्या कामांची दुरुस्ती आणि नवीन कामांचा प्रस्ताव मृद व जलसंधारण विभागाने तयार करावा. भूसंपादनामुळे रखडलेल्या मृद व जलसंधारण विभागाच्या प्रकल्पांचा आढावा घेताना आवश्यकतेनुसार भूसंपादनासाठी निधी वितरित करावा. घनसावंगी तालूक्यातील जांब तांडा साठवण तलाव या प्रकल्पाची प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षेत बैठकीचे आयोजन करुन त्यात निर्णय घेवून प्रस्ताव सादर करावा. एल निनोच्या पार्श्वभूमीवर जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत विशेष निधी व अभिसरणाची प्रस्तावित कामे तात्काळ पूर्ण करावीत. मागील वर्षात अतिवृष्टीने क्षतीग्रस्त झालेल्या योजनाची कामे पूर्ण करावी. जिल्हाधिकारी यांनी दर महिन्याला मृद व जलसंधारण विभागाच्या कामाचा आढावा घ्यावा. तसेच सर्व संबंधित विभागांनी जलतारा प्रकल्प राबविण्याला प्राधान्य द्यावे. सध्या पुरेसा पाणीसाठा असला तरी 'एल निनो' मुळे निर्माण होणारी संभाव्य पाणी टंचाई लक्षात घेवून नियोजन करावे. तसेच एल निनोच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील जलसंधारणाची जास्तीत-जास्त कामे करण्याच्या दिल्या. तसेच जालना जिल्ह्यात मृद व जलसंधारण विभागातील अभियंता यांची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही लवकर करण्यात येणार असल्याचे मंत्री संजय राठोड यांनी सांगितले. यावेळी सर्व लोकप्रतिनिधी यांनी प्रत्येक विधानसभा मतदार संघातील १ कोल्हापूरी (पान ३ वर)

## हर घर तिरंगा' मोहिमेतंर्गत वंदे मातरम् समूह गायन व योग प्रात्यक्षिकाचे आयोजन



जालना/प्रतिनिधी : 'हर घर तिरंगा' मोहिमेतंर्गत देशभक्ती, राष्ट्रीय एकात्मता, राष्ट्रप्रेम तसेच नागरिकांमध्ये आरोग्य व योगाबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने 'वंदे मातरम्' समूह गायन व 'योगा फॉर हेल्थ' योग प्रात्यक्षिक कार्यक्रमाचे दि. १४ ऑगस्ट, २०२६ रोजी सकाळी ८.०० ते ९.०० या कालावधीत जिल्हा क्रीडा संकुल, जालना येथे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमामध्ये 'वंदे मातरम्' गीताचे सामूहिक गायन तसेच 'योगा फॉर हेल्थ' अंतर्गत विविध योगासने व योग प्रात्यक्षिके सादर करण्यात येणार आहेत. या माध्यमातून नागरिक, विद्यार्थी व युवकांमध्ये देशभक्तीची भावना वृद्धिंगत करण्यासोबतच नियमित योगाभ्यासाचे महत्त्व अधोरेखित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास जिल्ह्यातील विद्यार्थी, क्रीडा शिक्षक, खेळाडू, अधिकारी-कर्मचारी तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी केले आहे.

## ग्रंथ हेच खरे गुरु, ज्ञान हाच जीवनाचा आधार'; गुरुपौर्णिमेनिमित्त विद्यार्थ्यांची ग्रंथालयाला भेट

जालना : गुरुपौर्णिमेनिमित्त संस्कार प्रबोधिनी विद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी व शिक्षकांनी नागसेन ग्रंथालयाला सदिच्छा भेट दिली. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध विषयांवरील पुस्तके, संदर्भग्रंथ, चरित्रे तसेच दैनिक वृत्तपत्रांचे वाचन करून वाचन संस्कृतीचा अनुभव घेतला.



नागसेन ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष राजेश राऊत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ग्रंथ हेच खरे गुरु असून, वाचन हीच यशाची गुरुकिल्ली आहे. नियमित वाचनामुळे ज्ञान, विचारशक्ती आणि व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो, असे सांगितले. आजच्या डिजिटल युगात विद्यार्थ्यांनी मोबाईलच्या वापरावर नियंत्रण ठेवून पुस्तकांशी मैत्री करावी आणि दररोज वाचनाची सवय लावावी, असे आवाहन त्यांनी केले.

स्पर्धा परीक्षा तसेच विविध क्षेत्रांत यश मिळविण्यासाठी इतिहास, विज्ञान, भूगोल, संविधान, साहित्य आणि चालू घडामोडींचे व्यापक ज्ञान आवश्यक असल्याचे राऊत यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तकांसोबत अवांतर वाचनावरही भर द्यावा, असे त्यांनी सांगितले.

यावेळी विद्यार्थ्यांना नागसेन ग्रंथालयातील ग्रंथसंपदा, वाचनगृह, अभ्यासिका, सदस्यत्व प्रक्रिया तसेच उपलब्ध सुविधांची माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी आवडीची पुस्तके वाचत ग्रंथालयातील वातावरणाचा अनुभव घेतला.

या कार्यक्रमास संस्कार प्रबोधिनी विद्यालयाचे भागवत मराठे, सीमा आरडे, सुवर्णा पाठक, सोनाली परभनकर आणि प्रशांत बोधक यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. नागसेन ग्रंथालयाच्या सचिव संगीता राजेश राऊत, ग्रंथपाल पवन लाड यांच्यासह ग्रंथालय कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी राऊत यांनी विद्यार्थ्यांनी नियमित वाचन करून ज्ञानसंपन्न, सुसंस्कृत व जबाबदार नागरिक बनण्याचा संकल्प करावा, असे आवाहन केले.

## दिव्यांगाचे प्रश्न मार्गी लावणार : महापौर मगरे

जालना- दिव्यांगाकडे बघण्याचा सामाजिक दृष्टीकोन बदलण्याची गरज असून महानगर पालिकेच्या वतीनेजालना शहरातील दिव्यांगाचे प्रश्न मार्गी लावणार असल्याची ग्वाही महापौर वंदना मगरे यांनी आज येथे दिली.



अपंग जनता दल सामाजिक संघटनेच्या वतीने सामाजिक भवनाच्या सभागृहात आयोजित दिव्यांग मार्गदर्शन मेळाव्याच्या उदघाटन प्रसंगी त्या बोलत होत्या. उपमहापौर राजेश राऊत हे अध्यक्षस्थानी होते. शिवसेनेचे शहरप्रमुख विष्णु पाचफुले, पत्रकार गणेश मगर , अपंग जनता दल सामाजिक संघटनेचे कार्याध्यक्ष भाऊसाहेब दसपुते ,दीपाली शेंडगे आदींची यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना महापौर मगरे पुढे म्हणाल्या की, दिव्यांग हे कुटुंबातील सदस्य मंडळींना आव्हान वाटते, समाजाचा दिव्यांगाकडे बघण्याचा दृष्टीकोनही वेगळा आहे. दिव्यांगावर मात करून आकाशाला गवसणी घालण्याचे विक्रम दिव्यांगानी केले आहेत. जालना महानगर पालिकेच्या वतीने दिव्यांगांना वेळोवेळी मार्गदर्शन केले जाते, त्यांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी आपण निश्चितपणे प्रयत्न करू, अशी ग्वाहीही महापौर मगरे यांनी यावेळी दिली. शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा दिव्यांग बांधवांनी लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

प्रमुख पाहुणे म्हणून बोलतांना विष्णू पाचफुले म्हणाले की, जालना शहरातील दिव्यांग बांधवांच्या प्रश्नांसाठी अपंग जनता दल संघटनेचे जालना जिल्हाध्यक्ष राहूल मुळे हे सातत्याने धडपड करीत असतात, महानगर पालिका प्रशासनाने दिव्यांग बांधवांच्या प्रश्नांची दखल घेऊन त्यांचे प्रश्न निकाली काढावेत, दिव्यांग बांधवांच्या प्रश्नांसाठी आमदार अर्जुन खोतकर हे सातत्याने पाठपुरावा करीत असल्याचे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय समारोप करताना राजेश राऊत म्हणाले की, दिव्यांग हे परिस्थितीशी झगडत असतात, जालना महानगर (पान ३ वर)

## कुंचल्यातून उमटणाऱ्या 'श्रीधर रेषा' थांबल्या! जालन्याचे ज्येष्ठ चित्रकार श्रीधर अंभोरे यांचे निधन

जालना, प्रतिनिधी : आपल्या कुंचल्यातून सामाजिक वास्तव, मानवी संवेदना आणि साहित्यिक आशयाला प्रभावी दृश्यरूप देणारे जालन्याचे ज्येष्ठ आणि प्रख्यात चित्रकार श्रीधर अंभोरे यांचे सोमवारी पहाटे निधन झाले. मृत्यूसमयी ते ७९ वर्षांचे होते. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू होते. उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाने जालना शहरासह महाराष्ट्राच्या कला आणि साहित्य क्षेत्राची मोठी हानी झाली आहे. श्रीधर अंभोरे हे केवळ चित्रकार नव्हते, तर आपल्या वैशिष्ट्यपूर्ण रेषांमधून साहित्याला दृश्यभाषा देणारे कलावंत म्हणून त्यांची स्वतंत्र ओळख होती. महाराष्ट्रातील अनेक लेखक, कवी आणि साहित्यिकांच्या पुस्तकांना त्यांनी आपल्या कलात्मक मुखपृष्ठांमधून वेगळी ओळख मिळवून दिली. त्यांच्या चित्रांमध्ये केवळ सौंदर्य नव्हे, तर आशय, संवेदना, सामाजिक भान आणि मानवी जीवनाचे विविध पैलू प्रभावीपणे उमटत असत.

'श्रीधर रेषां'ची स्वतंत्र ओळख अंभोरे यांच्या चित्रशैलीतील रेषांना स्वतंत्र ओळख प्राप्त झाली होती. अत्यंत मोजक्या आणि नेमक्या रेषांमधून एखादा विचार, प्रसंग किंवा भावना व्यक्त करण्याची त्यांची हातोटी उल्लेखनीय होती. त्यांच्या कलाकृतींनी जालना तसेच महाराष्ट्रातील साहित्य आणि कला क्षेत्रात आपला ठसा उमटविला.



अनेक लेखक-कवींच्या साहित्यकृतींना त्यांच्या मुखपृष्ठांच्या माध्यमातून मिळालेली दृश्य ओळख आजही त्यांच्या कलाप्रवासाची साक्ष देणारी आहे. त्यांच्या निधनामुळे या वैशिष्ट्यपूर्ण कलाशैलीचा एक महत्त्वाचा अध्याय संपल्याची भावना कला-साहित्य क्षेत्रातून व्यक्त होत आहे.

रामतीर्थ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार श्रीधर अंभोरे यांच्या पार्थिवावर सोमवारी दुपारी जालना शहरातील रामतीर्थ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी महाराष्ट्राच्या विविध भागांतून आलेले लेखक, कवी, चित्रकार, साहित्यिक, मित्रपरिवार आणि चाहत्यांनी त्यांना अखेरचा निरोप दिला.

अंत्यसंस्कारानंतर झालेल्या शोकसभेत त्यांच्या कला आणि साहित्य क्षेत्रातील योगदानाचा आवर्जून उल्लेख करण्यात आला. रवींद्र इंगळे, सुरेश साबळे, दासू वैद्य, उत्तम अंभोरे, अशोक इंगळे, मनोज पाठक, रवींद्र सातपुते, अशोक कोतवाल, शेषराव धांडे, राजेंद्र राख आणि राजेश ओ. राऊत यांनी श्रद्धांजलीपर मनोगत व्यक्त केले.

दूरध्वनीवरून शोकसंदेश अंभोरे यांच्या निधनाबद्दल महाराष्ट्रातील विविध भागांतील साहित्यिक आणि कलावंतांनी दूरध्वनीद्वारे शोक व्यक्त केला. रामदास फुटाणे, श्रीकांत देशमुख, यशवंत मनोहर, सुमती लांडे, सतीश बडवे, दा. गो. काळे, चित्रकार भ. मा. परसावळे आणि धनंजय गोवर्धन आदींचे शोकसंदेश पंडित तडेगावकर यांनी शोकसभेत वाचून दाखविले. कला-साहित्य क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती शोकसभेस शशिकांत शिंदे, संदीप काळे, नंदकिशोर आढाव, सतीश डेरेकर, दिलीप खोटे, मिलिंद बागुल, सत्यजित साळवे, सुधाकर कुराडे, बापू पानपाटील, रवींद्र साळवे, दिलीप सपकाळे, अनिल कांबळे, महेंद्र ताजने, बबन महामुने, डॉ. संजीवनी तडेगावकर, सुहास पोतदार, प्रभाकर शेळके, नारायण पाझाडे, शांतीलाल बनसोडे, प्राचार्य (पान ३ वर)